# मुंबई विद्यापीठ

प्रबंध विभाग
मुंबई विद्यापीठ
फोर्ट,
मुंबई–४०० ०३२.
दूरध्वनी क्र: २२७० ३२ ४८/२२ ७० ८७ २९
क्र. परीक्षा/प्रबंध विभाग/अधिसूचना/ २०१६ /२०१६

## अधिसुचना

## विद्यावाचस्पती (पीएच.डी.) प्रवेश पूर्व परिक्षा– सप्टेंबर २०१६

मुंबई विद्यापीठकडून कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, व्यवस्थापन, उपयोजित कला आणि अभियांत्रिकी शाखेतील विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पूर्व प्रवेश परिक्षा– सप्टेंबर २०१६ करिता उपलब्ध असलेल्या प्रवेश प्रक्रियेकरिता ऑनलाईन अर्ज मागविण्यास येत आहेत.

- **प्रवेश परीक्षेची तारीख आणि वेळ** : शनिवार दि. १७ सप्टेबंर, २०१६ दुपारी ०२.०० ते ०५.०० वाजे पर्यंत
- **प्रवेश परीक्षेचा अर्ज स्वीकारण्याची शेवटची तारीख** : ३१ ऑगस्ट, २०१६ दुपारी २:३० वाजेपर्यंत
- **पात्रता** : विद्यापीठाचे अधिनियम O.5473, O.5474, O.5476 व विद्यापीठाच्या VCD No.Exam./Thesis/Univ./VCD/2414 of 2010 dated 18th November, 2010 (Refer Annexure-I for VCD & Annexure-II forUG-441of 2005 Circular) संकेत स्थळावर उपलब्ध आहेत.
- **नोंदणी शुल्क (विना परतावा)** : 'वित्त व लेखा अधिकारी' मुंबई विद्यापीठ, यांच्या नावे अ). सर्वसामान्य वर्गासाठी रू.१०००/- चा धनाकर्श (Demand Draft) ब). मागासवर्गीय उमेदवारांसाठी रू.५००/- चा धनाकर्ष (Demand Draft) **वित्त व लेखा अधिकारी, मुंबई विद्यापीठ, मुंबई** यांचे नावे काढून प्रवेश अर्जासोबत जोडावा. आवेदन शुल्काची रक्कम रोखीने भरणा करावयाची असल्यास कक्ष क्र. १३, वित्त व लेखा विभाग, मुंबई विद्यापीठ, फोर्ट परिसर, मुंबई – ४०० ०३२ येथे दि. ३१ ऑगस्ट, २०१६ रोजी दुपारी २.३० वाजेपर्यंत रोखीने भरणा करून पावती अर्जा सोबत जोडावी व सदर अर्ज **प्रबंध विभाग, खोली क्र. १२९ पहिला मजला, मुंबई विद्यापीठ, फोर्ट कॅम्पस, मुंबई ४०० ०३२** येथे जमा करावा (मागासवर्गीय उमेदवारांनी जातीचा दाखला सोबत जोडणे आवश्यक आहे.)
- **प्रवेश परीक्षा** : कृपया Annexure-III मध्ये नमूद केलेल्या विविध विषयांतील अभ्यासक्रमात समाविष्ट असलेल्या अभ्यासाच्या विषयांवर.
- **प्रवेश परीक्षेमधून सवलत** : VCD No. Exam./Thesis/ Univ./VCD/ 2414 of 2010 Date 18th November, 2010.

परीक्षार्थींनी मुंबई विद्यापीठच्या संकेत स्थळावरुन (www.mu.ac .in) प्रवेश अर्ज ऑनलाईन भरुन त्याची दोन प्रती व शैक्षणिक पात्रतेच्या व अनुभवाच्या साक्षांकित प्रती तसेच मागासवर्गीय असल्यास जातीचा दाखला व आवश्यक शुल्कांचा धनाकर्श (Demand Draft) / रोख शुल्क भरणा केल्याची पावती सह कक्ष क्र. १२९, पहिला मजला, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई – ४०० ०३२, येथे दिनांक ३१ ऑगस्ट, २०१६ दुपारी २:३० वाजेपर्यंत जमा करावेत (प्रवेश अर्जाकरिता Annexure – IV पहावे).

उपरोक्त विषयांबाबतची सविस्तर माहिती विषयनिहाय रिक्त जागा व मार्गदर्शक यांची यादी ( Annexure – V ) मुंबई विद्यापीठाच्या संकेतस्थळावर (www.mu.ac.in) उपलब्ध आहे. उमेदवारांनी अर्ज सादर करण्यापुर्वी संकेत स्थळावरील सर्व नियम व परीपत्रके पहावी.

**दिनांक : १८ ऑगस्ट, २०१६**
**स्थळ : मुंबई – ४०० ०३२**

**(दिपक वसावे)**
**स्था.परिक्षा नियंत्रक**